आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
६ ऑक्टोबर २०२५ -सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींमधल्या नगराध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर

- MPSC कडून ९३८ पदांच्या भर्तीसाठी गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध

- बिहारमध्ये २ टप्प्यात ६ आणि ११ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान

**आणि**

- मेरी ब्रंकोव्ह, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना वैद्यकीय क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

**<><><><>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत मुंबईत झाली.

२४७ नगर परिषदांमधल्या ३३ अनुसूचित जातींसाठी, ११ अनुसूचित जमातींसाठी, ६७ ओबीसींसाठी आरक्षित असून उर्वरित १३६ नगर परिषदांमधलं नगराध्यक्ष पद खुल्या गटातल्या उमेदवारांना मिळतील.

१४७ नगर पंचायतींपैकी १८ अनुसूचित जातींसाठी, १३ अनुसूचित जमातींसाठी, ४० ओबीसींसाठी आरक्षित आहेत. नगर पंचायतींमधल्या उर्वरित ७६ जागांवर खुल्या प्रवर्गातून नगराध्यक्ष निवडून येतील.

सर्व गटातल्या निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत.

**<><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या यावर्षी होणाऱ्या निवडणुकांसाठी अंतिम प्रभाग रचनेला राज्य निवडणूक आयोगानं मंजूरी दिली आहे. ही प्रभाग रचना शासन राजपत्रामध्ये आणि महानगरपालिका संकेतस्थळावर आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**<><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांच्या सभापतीपदासाठी आज आरक्षण सोडत झाली. साक्री पंचायत समिती अनुसूचित जमाती महिला आणि धुळे पंचायत समिती सर्वसाधारण महिला याप्रमाणे सभापती पदाचे आरक्षण राखीव झालं. शिरपूर पंचायत समितीचं सभापती पद अनुसूचित जमाती, आणि शिंदखेडा पंचायत समितीचं सभापदी पद ओबीसी सदस्याला मिळणार आहे.

<><><><>

MPSC अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात आज प्रसिद्ध केला. या अंतर्गत ९३८ पदांसाठी ४ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होईल. यासाठी ७ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करता येईल.

यात उद्योग निरीक्षक संवर्गातली ९ पदं, तांत्रिक सहायक संवर्गासाठी ४ पदं, कर सहायक संवर्गासाठी ७३ पदं, तसंच लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी ८५२ पदांचा समावेश आहे. विविध श्रेणीत १८ ते ४३ वयोगटातले उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांच्यासाठी वयोमर्यादेची अट आणखी शिथिल आहे.

<><><><>

महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या अमर्याद संधी आहेत, त्यामुळे राज्यात गुंतवणूकदारांनी अधिकाधिक गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत ट्वेंटी-ट्वेंटी गुंतवणूक संघटनेच्या शिष्टमंडळासोबत आयोजित बैठकीत बोलत होते.

धोरणात्मक सुधारणा, पायाभूत सुविधांचा होत असलेला विकास यामुळे महाराष्ट्र हे देशाचं ' ग्रोथ सेंटर' बनलं आहे. मुंबई ही देशाच्या आर्थिक राजधानी सोबतच मनोरंजन, स्टार्ट अपची सुद्धा राजधानी आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे देशातलं गुंतवणुकीचं 'मॅग्नेट'ही ठरलं आहे, असं ते म्हणाले.

उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १३ वी बैठकही आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महाराष्ट्र सौर पॅनेल निर्मिती क्षेत्रात देशात आघाडी घेत आहे. या क्षेत्रामध्ये होत असलेल्या भरीव कामामुळे मोठी ‘ग्रीन इको सिस्टीम’ निर्माण होणार आहे. ग्रीन स्टील हे नवीन क्षेत्र असल्यानं ग्रीन स्टील संदर्भात धोरण तयार करण्यासाठी एक समिती गठित केली जाणार असल्याचं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

<><><>

मुंबईत 'झवेरी बाजार जेम्स अँड ज्वेलरी फेस्टिव्हल 2025' च्या मुख्य प्रदर्शनाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं.

अनेक दशकांचा वारसा आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचा वाटा असलेल्या झवेरी बाजार परिसराची पुनर्रचना आणि सुशोभीकरण करण्यासाठी झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशननं पुढाकार घ्यावा, राज्य शासनाच्या यंत्रणा त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करतील, असं मुख्यमंत्र्यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितलं.

<><><>

राज्य शासनाचा कृषी विभाग आणि एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन, तसंच ग्रामविकास विभाग आणि टाटा मोटर्स फाउंडेशन यांच्यात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाले. पारंपरिक आणि स्थानिक भरड धान्यांच्या उत्पादन आणि प्रक्रिया शेती उद्योगांना प्रोत्साहन देणं, राज्यातल्या १० आकांक्षित तालुक्यांमधल्या ६३ ग्रामपंचायतींमध्ये हा एकात्मिक ग्राम विकास कार्यक्रम राबवणं हे या कराराचं उद्दिष्ट आहे.

<><><>

मुंबईतल्या गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर नाशिकमध्ये चित्रनगरी उभारायला राज्य शासनानं आज मान्यता दिली. या चित्रनगरीसाठी प्रस्तावित असलेला नाशिक जिल्ह्यातला इगतपुरीचा परिसर नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत सुसंपन्न आणि सुंदर आहे. इगतपुरी ते मुंबई अंतरसुद्धा आता लक्षणीयरित्या कमी झालं आहे. त्यामुळे इगतपुरी तालुक्यात मौजे मुंढेगाव इथे चित्रनगरी उभारणं उचित ठरेल, असा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये आज झाला.

<><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर १४ नोव्हेंबरला मतमोजणी होईल, अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केली. एकूण २४३ पैकी पहिल्या टप्प्यात १२१ तर दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघात मतदान होणार आहे.

**- - होल्ड - ज्ञानेश कुमार - -**

जम्मू काश्मीर, राजस्थान, झारखंड, तेलंगणा, पंजाब, मिझोरम आणि ओडिशामधल्या विधानसभेच्या ८ जागांसाठी पोटनिवडणूकही त्यांनी आज जाहीर केली.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कररचनेमुळे अनेक वस्तू, पदार्थ स्वस्त झाल्याने ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. आज आपण जाणून घेणार आहोत जीएसटी सुधारणेमुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या सकारात्मक परिणामाबद्दल....

**-----व्हीसी-----(१.१० सेकंद)**

*(नव्या कररचनेमुळे महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना मोठा फायदा होणार आहे. राज्यात साखर कारखाने, फळ-भाज्या प्रक्रिया उद्योग, मत्स्यव्यवसाय, हातमाग उद्योग यासह अनेक लघु आणि मध्यम उद्योग आहेत. जीएसटी सुधारणेमुळे या सर्व क्षेत्रातील वस्तूंचा उत्पादन खर्च कमी होणार आहे, त्यामुळे वस्तूंच्या किमतीही कमी होतील आणि ग्राहकांना दिलासा मिळेल. तसंच  शेतकरी, कारागीर, कामगार आणि व्यावसायिकांना याचा थेट लाभ मिळणार आहे. परिणामी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास यामुळे मदत मिळणार आहे. प्रक्रिया केलेल्या साखर आणि अन्नपदार्थावरील जीएसटी कमी झाल्यामुळे त्यांचे  दर ६ ते ७ टक्क्यांनी कमी झाले आहेत. जवळपास ५० लाख शेतकरी आणि २ लाख कामगारांना याचा फायदा मिळणार आहे. प्रक्रिया केलेल्या आणि परीरक्षण केलेल्या माशांवरचा जीएसटी ५ टक्के झाला आहे, याचा लाभ दोन लाख मच्छिमारांना होणार आहे. कापड, चामडे, पैठणी आणि वारली कलाकृतीवरच्या जीएसटी सवलतीमुळे एक लाखापेक्षा जास्त कामगार आणि कारागिरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल होणार आहेत. वाहन उद्योग, संरक्षण, माहिती तंत्रज्ञान, औषध निर्माण, विमा या सर्व क्षेत्रांमधे जीएसटी सुधारणा झाल्यामुळे लाखो लोकांना लाभ होणार असून त्यांचं जीवनमान उंचावण्यास हातभार लागणार आहे. त्यामुळे जीएसटी सुधारणांमुळे  महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळेल यात शंका नाही.)*

**<><><><>**

मेरी ब्रंकोव्ह, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना शरीरक्रियाशास्त्रतल्या क्रांतिकारी संशोधनासाठी २०२५ या वर्षाचा वैद्यकीय क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

करण्यात आला आहे. या संशोधनामुळे ऑटो इम्यून म्हणजेच आत्मप्रतिरक्षेमुळे होणाऱ्या आजारांवर उपचार करता येणार आहेत आणि ते पूर्ण बरेही करता येणार आहेत. यासोबतच कर्करोग आणि स्टेम सेल प्रत्यारोपणानंतरची गुंतागुंत टाळता येणार आहे.

**<><><><>**

**परभणी** शहर आणि परिसरात आज पहाटे मुसळधार पाऊस झाला. परभणीत एकाच दिवसात तब्बल ९८ पूर्णांक २ दशांश मिमी इतक्या विक्रमी  पावसाची नोंद झाल्याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागानं दिली आहे. पावसामुळे शहराचा सखल भाग  जलमय झाला आहे.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**